# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व संबंधित प्रशासकीय विभागप्रमुख/अधिविभागप्रमुख यांना कळविणेत येते की, आपल्या विभागाकडे मुलाखती/बैठका/इतर कारणांसाठी विविध मान्यवर/प्राध्यापक येत असतात. त्यांची प्रवासभत्ते/मानधनाची देयके या कार्यालयात सादर केली जातात. या विभागातून देयके पारित होवून संबंधितांच्या बॅक खात्यावरती वेळेवर रक्कमा जमा केल्या जातात.

तथापी काही प्राध्यापक/मान्यवर यांच्या सदर रक्कमा वेळेवर प्राप्त न झालेबाबत वारंवार या कार्यालयात तक्रारी प्राप्त होत आहेत. सदरची देयके तत्काळ लेखा विभागाकडे सादर करणेबाबत यापूर्वीच सूचना देणेत आलेल्या आहेत. तरीसुद्धा काही विभागाकडून विलंबाने देयके सादर होत आहेत हे योग्य नाही. यास्तव या परिपत्रकाद्धारे आपणास पुन:श्च कळविणेत येत आहे की, प्रवासभत्ते/मानधनाची देयके बैठका झालेबरोबर तत्काळ लेखा विभागाकडे पाठविण्याची कार्यवाही करावी व संबंधिताच्या रक्कमा त्यांच्या खात्यावर जमा झाल्या किंवा कसे याबाबत TA/DA_विभागाशी संपर्क साधून संबंधित प्राध्यापक/मान्यवर यांना कळविण्यात यावे. याबाबत पुन्हा तक्रारी होणार नाहीत याची दक्षता घेणेत यावी.

प्र-वित्त व लेखा अधिकारी

लेखा व प्रवासभत्ते विभाग
दि.२७ /०८/२०२१